**Schedule referred to hereinabove**

5 (Five) fully paid up shares of Rs.50/- (Rupees Fifty Only) each bearing Distinctive Nos. 146 to 150 (both inclusive) held under Share certificate no. 067 dated 30/03/1991 issued under the common seal of Satrunjay Giri Co-Operative Housing Society Ltd. Related to **Flat No. B-205** on the 2nd Floor of the building known as Satrunjaygiri Apartment-B of Satrunjay Giri Co-operative Housing Society Limited, Ashok Chakravarti Road, Kandivali East, Mumbai – 400 101.

**Date: 29.01.2026** **Sd/-**
**Place: Mumbai** **Mamatha Balyaya**
**Advocate, High Court, Mumbai**
**208, Narayan Bhuvan, 2nd Floor, 82/86, Bazar Gate Street, Fort, Mumbai – 400 001**

## PUBLIC NOTICE

The present Notice is hereby given to the public at large to inform that my client Mr. Bharatkumar Vithaldas, who is the owner of Flat No. 18, Jai Ashish Apartment, Co-operative Housing Society Ltd., Ratan Nagar, Near St. Xavier's School, D.N. Dubey Road, Dahisar (East), Mumbai- 400 068 wish to declare that he holds the aforesaid Premises as absolute and exclusive owner thereof and as a Member of the abovenamed Society, holds five fully paid shares of the face value of Rs. 50/- each bearing distinctive nos. 86 to 90 (both inclusive) under Share Certificate No. 18 issued to him by purchase of the aforesaid Flat.

My client further states that the above described Share Certificates is lost by my client and the same could not be found even after due and diligent search. My client has lodged the Police Complaint for the same on 17/01/2026 at Dahisar Police Station, Dahisar (East), Mumbai- 400 068 vide Complaint ID No. 8151/2026. My client has also gave application to the abovenamed Society for issuing Duplicate Share Certificate.

The public at large are hereby informed that if, anybody have found or have any claim, right, and interest of any nature by way of sale, gift, lease, mortgage, charge, lien, trust or otherwise in respect of the aforesaid flat by way of the aforesaid lost Share Certificate or any part thereof, contact me to my below mentioned address with necessary documentary proof thereof within 15 days from the date of this publication.

Dated this 29th day of January, 2026.

**Sd/-**
**Mrs. Megha Milind Raorane**
**Advocate, High Court**
Office: 01/601, Om Gokul Garden CHSL, Thakur Complex, Kandivali (East), Mumbai – 400101
Mobile: +91 81699 27194
Email: raoranemegh@gmail.com

## Maharashtra Industrial Development Corporation

(A Government of Maharashtra Undertaking)

**Extension Notice No.5**

**E Tender Notice No.52 /2025-2026 (Mumbai)**

Vide above E Tender Notice, tender for following work were published in Daily Navakal, Mumbai, Daily Apala Mahanagar, Mumbai, Daily Sagar, Thane, Daily Hindustan Times, Mumbai, Daily Mid Day, Mumbai, Daily Active Times, Mumbai, Daily Bhaskar, Mumbai, Daily Navbharat, Mumbai on 04/11/2025.

| Sr. No. | Name of Work | Estimated Cost Rs. in Cr. |
|---|---|---|
| 1 | Construction of "Ratan Tata Udyog Bhavan" MIDC (HQ) along with Printing Press Building for Maharashtra Industrial Development Corporation on Engineering Procurement and Construction (EPC) mode. | ₹ 903.08 |

Now the Extension Notice is hereby issued for extending the date of availability of E Tender, raising of queries and reply to queries on website of https://mahatenders.gov.in for the above works.

The blank tender forms for above works will now be available upto 04/03/2026 on website of https://mahatenders.gov.in

Pre bid meeting for work will be conducted on 12/02/2026 at 12.00 PM in the office of the Chief Engineer (HQ), Udyog Sarthi MIDC Mariol Industrial Area Mumbai-93. Answers to the queries / MIDC Clarification will be available from 20/02/2026 on above website.

Please note that the bidders who have already submitted / uploaded their offer will again have to reload or resubmit their offer with or without change, such bidders shall also note that if offers is not reloaded or resubmitted, their bid will be out of completion for the this tender in particular.

Other contents of the tender notice remain unchanged.

टिप:- निविदा सूचना महामंडळाच्या लोगोसह कमीत कमी जागेचा वापर करुन प्रसिद्ध करण्यात यावी.

## GSB FINANCE LTD.

**CIN:L99999MH2001PLC134193**
**Regd. Office: 201, 2nd Floor, Eco Space I.T. Park Building, Village Mogra, Old Nagardas Road, Andheri (E), Mumbai 400069. Telephone No.: 0771-4210000 , Email : compliance@gsbfinancelimited.com**
**Extract of Audited Financial Results for the Quarter and Nine Months ended on 31 December, 2025**
**(Rs. in Lakh except per share data)**

| Sr. No. | Particulars | Quarter ended 31.12.2025 | Quarter ended 30.09.2025 | Quarter ended 31.12.2024 | Nine Months Ended 31.12.2025 | Nine Months Ended 31.12.2024 | Year ended 31.03.2025 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Total Income from Operations | 30.75 | 31.62 | 43.91 | 93.51 | 150.70 | 179.42 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 15.15 | (29.46) | 16.97 | 0.52 | 95.33 | 83.12 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 15.15 | (29.46) | 16.97 | 0.52 | 95.33 | 83.12 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 18.43 | (29.69) | 13.28 | (0.28) | 82.37 | 71.65 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 18.43 | (29.69) | 13.28 | (0.28) | 82.37 | 71.65 |
| 6 | Equity Share Capital | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | | | 837.77 |
| 8 | **Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) -** | | | | | | |
| | -Basic EPS | 0.31 | (0.49) | 0.22 | (0.00) | 1.37 | 1.19 |
| | -Diluted EPS | 0.31 | (0.49) | 0.22 | (0.00) | 1.37 | 1.19 |

**Note :**
The above is an extract of the detailed format of unaudited financial results for the quarter and nine months ended on 31 December 2025 filed with Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly financial results is available on the website of the Company: www.gsbgroup.co.in and on the website of the BSE Ltd.: www.bseindia.com.
The above audited financial results were reviewed by the Audit Committee and thereafter approved by the Board of Directors at their meeting held on 28 January 2026.

**By order of the Board of Directors**
**For GSB Finance Ltd**
**Vivek Kumar Singhal**
**Managing Director**
**DIN: 01962224**

**Place : Mumbai**
**Date : 28-01-2026**

# ‘अजितदादांसोबत जातेय, नांदेडमध्ये पोहोचले की फोन करेन’



## फ्लाईट अटेंडंट पिंकीचे वडिलांसोबत शेवटचे शब्द

■ **प्रतिनिधी, मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामतीमध्ये झालेल्या विमान अपघातात मृत्यू झाला. त्या घटनेत त्यांच्यासह अन्य चौघांचा मृत्यू झाला. त्यात मुंबईतील फ्लाईट अटेंडंट पिंकी माली हीचा देखील समावेश होतो. तिच्या अकाली मृत्युच्या वृत्तामुळे वरळीत शोककळा पसरली आहे.

बारामतीमध्ये आज अजित पवारांच्या चार सभा होणार होत्या. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूक प्रचारासाठी या सभांचे आयोजन करण्यात आले होते. सुपे जिल्हा परिषद गटासाठीही एक सभा होणार होती. यासाठी अजित पवार विमानाने मुंबईहून बारामतीमध्ये आले होते. मात्र, विमानाचे लँडिग होत असताना तांत्रिक अडचणींमुळे वैमानिकांचे नियंत्रण सुटले आणि क्षणार्धात विमान खाली कोसळले.

त्या भीषण दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह अन्य चौघांचा मृत्यू झाला. मृत कर्मचाऱ्यांमध्ये ठाण्यातील फ्लाईट अटेंडंट पिंकी माली (२९) हीचा समावेश होता. मॉडेलिंगच्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा बाळगणाऱ्या पिंकीची स्वप्न या दुर्घटनेत जळून खाक झाली. वरळीत म्हणजेच तिच्या माहेरी तिचे आई बाबा, भाऊ राहतात.

कुटुंबीयांना भेटण्यासाठी ती अधूनमधून वरळीत येत असे. तसेच, नित्याने आई बाबांशी फोनवर बोलून त्याची विचारपूस करत असे. नेहमीप्रमाणे मंगळवारी रात्री तिने बाबांना फोन केला. ‘उद्या सकाळी अजितदादांसोबत बारामतीला जाणार आहे. त्यांनतर मी वैयक्तिक कामासाठी पुढे नांदेडला जाईन. तिथे हॉटेलमध्ये पोहोचल्यानंतर तुम्हाला फोन करते’, हा तिचा वडिलांसोबतचा शेवटचा संवाद. लेकीच्या अकाली जाण्याने तिच्या कुटुंबीयांना जबर मानसिक धक्का बसला आहे. आई बाबांना आधार देण्यासाठी त्यांची मोठी लेक, कोकिलाबेन रुग्णालयातील परिचारिका माहेरी आली आहे.

## राज्यातील शाळांना सुटी, तर मुंबई विद्यापीठाने परीक्षा पुढे ढकलल्या!

■ **प्रतिनिधी, मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने राज्य सरकारने बुधवारी शासकीय सुटी जाहीर केली. त्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व शाळांना सुटी जाहीर केली. तसेच मुंबई विद्यापीठाने दुपारच्या सत्रामध्ये होणाऱ्या सर्व परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला. यासंदर्भात मुंबई विद्यापीठाकडून सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, सीडीओई यांना कळविण्यात आले आहे.

मुंबई विद्यापीठाच्या सध्या हिवाळी सत्राच्या परीक्षा सुरू आहेत. त्यानुसार सर्व महाविद्यालये व परीक्षा केंद्रांवर परीक्षा घेण्यात येत आहेत. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बुधवारी सकाळी विमान अपघातात निधन झाले. त्यामुळे राज्य सरकारने तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करत २८ जानेवारी रोजी शासकीय कार्यालयांना सुटी जाहीर केली. त्याअनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या सुरू असलेल्या दुपारच्या सत्रातील



परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय जाहीर केला.

संबंधित विद्यार्थ्यांना याबाबत तात्काळ कळविण्याच्या सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या. वाणिज्य व व्यवस्थापन, कला व शिक्षण शाखांशी संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, तसेच सेंटर फॉर डिस्टन्स अँड ऑनलाइन एज्युकेशनचे (सीडीओई) संचालक यांना यासंदर्भात पत्राद्वारे कळवण्यात आले आहे. २८ जानेवारी रोजी दुपारी होणाऱ्या परीक्षा पुढील तारखेला घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. या परीक्षेसंदर्भातील नव्या तारखा लवकरच जाहीर केल्या जातील, असेही विद्यापीठाकडून जाहीर करण्यात आले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळांना दुपारच्या सत्रामध्ये सुटी जाहीर करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. त्यानुसार शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना पत्राद्वारे कळवले.

## ६६ वर्षे ६ महिने ६ दिवस! ६ च्या फेऱ्याने घेरले!

■ **प्रतिनिधी, मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आज २८ जानेवारी २०२५ रोजी विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या अकाली एग्झिटमुळे महाराष्ट्राला मोठा धक्का बसला आहे. अजित पवार यांच्या निधनामुळे राजकारणातील दिलदार माणूस गमावली खंत व्यक्त केली जात आहे. अजित पवार बारामतीच्या विकासासाठी खूप झटले, शेवटी त्याच मातीत त्यांचा दुर्दैवी शेवट झाला. दरम्यान अजित पवार यांच्या मृत्यूनंतर सोशल मीडियावर एक वेगळीच चर्चा सुरू झाली आहे. अजित पवारांचा मृत्यूचा संबंध ६ आकड्याशी जोडला जात आहे.

अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ चा. अजित पवारांचा मृत्यू २८ जानेवारी २०२६. म्हणजे अजित पवार गेले तेव्हा अजित पवारांचं वय होतं ६६ वर्षे, ६ महिने आणि ६ दिवस. योगायोगमध्ये अजित पवारांनी ६ वेळा विविध सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपद भूषवलं आहे. त्यामुळे त्यांचे आणि ६ आकड्याचं कनेक्शन जोडलं जात आहे. सोशल मीडियावर अशा प्रकारचे विविध व्हिडिओ समोर येत आहेत. ज्यामध्ये अजित पवार यांच्यासाठी ६ आकडा दुर्दैवी ठरल्याचं म्हटलं जात आहे. दरम्यान या सर्व चर्चा सोशल मीडियावर रंगल्या आहेत.

## क्रॅश झालेले राजकारण! संजय गांधी ते आज अजित पवार

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघातानंतर घटनास्थळावरून धुराचे लोट हवेत पसरले होते. या घटनेने संपूर्ण राजकीय वर्तुळात मोठी शोककळा पसरली असून भारताच्या राजकीय इतिहासातील विमान अपघातांच्या काळ्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या आहेत.

**संजय गांधी (१९८०)**

भारताच्या इतिहासातील सर्वात चर्चिलेल्या विमान अपघातांपैकी एक म्हणजे संजय गांधी यांचे निधन. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे चिरंजीव आणि आणीबाणीच्या काळातील एक शक्तिशाली नेते म्हणून संजय गांधी यांची ओळख होती. २३ जून १९८० रोजी दिल्लीत एका विमान अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचे वय अवघे ३३ वर्षे होते. सफदरजंग विमानतळाजवळ एका दुचाकी विमानाचे प्रायोगिक उड्डाण करत असताना हा अपघात झाला होता. या घटनेने त्यावेळी देशाला मोठा धक्का दिला होता.

**विजय रुपाणी (२०२५)**

गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा २०२५ मध्ये एअर इंडियाच्या बोईंग ७८७-८ ड्रीमलाइनर अपघातात मृत्यू झाला. अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या या विमानाने उड्डाण केल्यानंतर काही वेळातच ते एका मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलवर कोसळले. या भीषण दुर्घटनेत २४१ लोकांचा जीव गेला होता.

**माधवराव सिंधिया (२००१)**

ग्वाल्हेर राजघराण्याचे वारसदार आणि काँग्रेसचे दिग्गज नेते माधवराव सिंधिया यांचा ३० सप्टेंबर २००१ रोजी विमान अपघातात मृत्यू झाला. एका राजकीय सभेसाठी जात असताना उत्तर प्रदेशातील मैनपुरी जिल्ह्यात त्यांचे चार्टर्ड विमान कोसळले. या अपघातात विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला होता.

**वाय. एस. राजशेखर रेड्डी (२००९)**

अशीच एक दुर्दैवी घटना आंध्र प्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री वाय एस राजशेखर रेड्डी यांच्यासोबत घडली. २ सप्टेंबर २००९ रोजी नल्लामाला टेकड्यांच्या परिसरात त्यांचे हेलिकॉप्टर कोसळले. मोठ्या शोधमोहिमेनंतर दुसऱ्या दिवशी त्यांचे अवशेष सापडले होते.

**जीएमसी बालयोगी (२००२)**

लोकसभेचे माजी सभापती आणि तेलगू देसम पार्टीचे नेते जीएमसी बालयोगी यांचा ३ मार्च २००२ रोजी हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. आंध्र प्रदेशातील पश्चिम गोदावरी जिल्ह्यात तांत्रिक बिघाडामुळे त्यांचे हेलिकॉप्टर कोसळले होते.

**दोर्जी खांडू ( २०११)**

अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोर्जी खांडू यांचे हेलिकॉप्टर भारत-चीन सीमेजवळील दुर्गम भागात कोसळले. ३० एप्रिल २०११ रोजी झालेल्या या अपघातात त्यांचा मृत्यू झाला आणि पाच दिवसांच्या शोधमोहिमेनंतर त्यांचे विमान सापडले होते.

**ओ. पी. जिंदाल आणि सुरेंद्र सिंह (२००५)**

३१ मार्च २००५ रोजी प्रसिद्ध उद्योगपती आणि हरियाणाचे मंत्री ओ पी जिंदाल आणि माजी केंद्रीय मंत्री सुरेंद्र सिंह यांचे उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले.

## तरुण आणि कुशल पायलटचा अंत

■ **प्रतिनिधी, मुंबई**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला बारामतीजवळ भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत विमानातील सर्व ६ जणांचा मृत्यू झाला असून यामध्ये मुख्य पायलट कॅप्टन शांभवी पाठक यांचाही समावेश आहे. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रासह विमान वाहतूक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून एका तरुण आणि कुशल पायलटचा अंत झाला आहे. बारामती विमानतळावर लँडिंगचा प्रयत्न करत असताना हे चार्टर्ड विमान कोसळले. या लिअरजेट ४५ विमानाचे सारथ्य कॅप्टन शांभवी पाठक करत होत्या. विमानाने नियंत्रण गमावल्यामुळे हा अपघात झाल्याचे प्राथमिक अहवालात म्हटले आहे.

या विमानात अजित पवार यांच्यासह त्यांचे सुरक्षा अधिकारी, दोन पायलट आणि इतर क्रू मेंबर्स असा एकूण ६ जणांचा ताफा होता. या सर्वांचा या भीषण अपघातात मृत्यू झाला असून शांभवी पाठक यांनी शेवटच्या क्षणापर्यंत विमान सुरक्षित उतरवण्याचा प्रयत्न केला असावा, अशी चर्चा आता व्यक्त होत आहे.

कॅप्टन शांभवी पाठक यांची शैक्षणिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमी अत्यंत मजबूत होती. त्यांचे शालेय शिक्षण एअर फोर्स बाल भारती स्कूलमधून झाले होते. त्यानंतर त्यांनी मुंबई विद्यापीठातून एरोनॉटिक्स, एव्हिएशन आणि एरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजीमध्ये बॅचलर ऑफ सायन्स ही पदवी मिळवली होती. वैमानिक होण्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी न्यूझीलंड इंटरनॅशनल कमर्शियल पायलट अकादमीमध्ये प्रवेश घेतला आणि तिथे प्रगत उड्डाण प्रशिक्षण पूर्ण केले. बिझनेस जेट सेगमेंटमधील एक प्रशिक्षित आणि पात्र पायलट म्हणून त्यांची ओळख होती.

शांभवी पाठक यांच्या निधनामुळे विमान वाहतूक क्षेत्रातील त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये आणि मित्रपरिवारात दुःखाचे वातावरण आहे. एक अत्यंत समर्पित आणि अनुभवी वैमानिक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. अनेक वर्षांचे विशेष प्रशिक्षण आणि उड्डाणाचा दांडगा अनुभव असूनही काळाने त्यांच्यावर झडप घातली.




■ **शिक्षण मंत्रालयातील अपयश आणि जबाबदारी**

नवीन युजीसी मार्गदर्शक तत्त्वांमुळे देशभरात गोंधळ आणि असंतोष निर्माण झाला आहे. यासाठी थेट जबाबदार मानले जात आहेत शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान. धोरणात्मक स्पष्टता आणि शैक्षणिक दृष्टीकोन यांचा अभाव त्यांच्या कामकाजात दिसून येतो. परिणामतः विद्यार्थ्यांचा आणि शिक्षकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. मंत्रीपद म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे, तर जबाबदारीने निर्णय घेणे. पण चुकीच्या निर्णयांमुळे सरकारची प्रतिमा मलिन होते. सर्वात मोठा धोका बाहेरून नसतो, तर आतून होणाऱ्या भितरघातात असतो. जर मंत्र्यांनी जाणूनबुजून चुकीचे निर्णय घेतले, तर संपूर्ण सरकार अडचणीत येते. त्यामुळे पंतप्रधानांनी आपल्या मंत्र्यांच्या कामकाजावर विशेष लक्ष ठेवणे गरजेचे आहे. अन्यथा, जनतेचा विश्वास गमावण्याची किंमत फार महागात पडेल. जबाबदारी न पाळणाऱ्या मंत्र्यांना राजकीय उत्तरदायित्वातून मुक्त करणे हीच खरी सुधारणा ठरेल.

■ **कर्तव्यपथावरील बदलांचा अभिमान**

भारताच्या प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यात गेल्या काही वर्षांत झालेला बदल अनुभवण्यासारखा आहे. पद्म पुरस्कार आता खऱ्या समाजसेवकांना, लोककलावंतांना आणि विविध क्षेत्रात ठोस काम करणाऱ्या नागरिकांना मिळू लागले आहेत. कर्तव्यपथावर दाखवले गेलेले चित्ररथ भारतीय मातीशी आणि संस्कृतीशी जोडलेले होते. वंदेमातरम् चे संपूर्ण गायन आणि त्यावर २५०० कलाकारांचे नृत्य हे राष्ट्रीय अभिमानाचे दर्शन घडवणारे होते. पंतप्रधान स्वतः प्रमुख पाहुण्यांना प्रत्येक चित्ररथाची माहिती देत होते, तर मागे ‘‘आत्मनिर्भर भारत‘‘ ठळकपणे लिहिलेले होते. विज्ञान, संरक्षण आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रदर्शन यामध्ये महिलांचा लक्षणीय सहभाग होता. तिन्ही सैन्यदलांकडून सलामी स्वीकारणाऱ्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या बदलाला अधिक अर्थपूर्ण केले. हा सोहळा दाखवतो की भारत परंपरेचा अभिमान राखत आधुनिकतेकडे आत्मविश्वासाने वाटचाल करत आहे.

■ **युजीसी समिती आणि मंत्रालयाची भूमिका**

सर्वोच्च न्यायालयात इंदिरा जयसिंग यांनी एसटी-एनटी विद्यार्थ्यांवरील भेदभावाचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर केंद्र सरकारने धर्मेंद्र प्रधान यांच्या शिक्षण मंत्रालयाखाली दिग्विजय सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. या समितीने तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांची भेट घेतली आणि ओबीसींनाही सामावून घेण्याची सूचना केली. डिसेंबरमध्ये समितीने अहवाल सादर केला. या अहवालात अनेक वादग्रस्त मुद्दे होते, तरीही मंत्रालयाने त्यावर फारसा आढेवेढा न घेता तो तसाच स्वीकारून गॅझेट नोटिफिकेशन काढले. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ आणि असंतोष वाढला. शिक्षण क्षेत्रातील धोरणात्मक निर्णयांमध्ये पारदर्शकता आणि सखोल चर्चा आवश्यक असते. पण घाईघाईत घेतलेले निर्णय समाजातील दुर्बल घटकांना अधिक दूर लोटतात. मंत्रालयाने जबाबदारीने विचार करून सुधारणा करणे गरजेचे आहे, अन्यथा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होईल.

■ **भारत-युरोप करार : नवे समीकरण**

भारत आणि युरोपियन संघाने ‘‘मदर ऑफ ऑल डील्स‘‘ म्हणून ओळखला जाणारा ऐतिहासिक करार केला आहे. या करारामुळे भारतात बीएमडब्ल्यू, मर्सिडीजसारख्या गाड्या, चॉकलेट, वाइन यांसारख्या वस्तू स्वस्त होतील. त्याचबरोबर युरोप भारतातील कुशल कर्मचारी, विद्यार्थी आणि संशोधकांना संधी देणार असून यासाठी भारतातच कार्यालये उभारणार आहे. ही घडामोड जागतिक आर्थिक समीकरणात मोठा बदल घडवते. दुसरीकडे, अमेरिकेने H-1B व्हिसा स्टॅम्पिंग पुढे ढकलल्याने भारतीय कामगारांसाठी युरोप अधिक आकर्षक ठरणार आहे. २०२५ मध्ये भारतात फक्त २२५ टेस्ला गाड्या विकल्या गेल्या असल्या तरी आता जागतिक बाजारात भारताची भूमिका वेगळी ठरत आहे. हा करार दाखवतो की भारत दबावाखाली नव्हे तर समानतेच्या अटींवर भागीदारी करतो. भारतीय कामगारशक्ती आता युरोपकडे अधिक वेगाने आकृष्ट होणार आहे.

■ **बाबासाहेब आणि हिंदुत्ववादी सन्मान**

बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य केवळ दलित समाजापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी हिंदू समाजातील अस्पृश्यता निवारण, हिंदू कोड बिल, समान नागरी कायदा यांसारख्या महत्त्वाच्या सुधारणा पुढे नेल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाविषयी त्यांनी स्पष्ट मत व्यक्त केले, तर सावरकरांच्या पतितपावन मंदिराला पाठिंबा दिला. पाकिस्तानातून शेवटचा हिंदू भारतात आणावा आणि शेवटचा मुस्लिम पाकिस्तानात पाठवावा, अशी त्यांची भूमिका होती. इतक्या उपकारांमुळे बाबासाहेब हिंदुत्ववाद्यांसाठी प्रेरणास्त्रोत ठरतात. त्यामुळे स्वयंसेवकांना बाबासाहेबांचा सन्मान कसा करायचा हे कोणी शिकवण्याची गरज नाही. भारतरत्नही त्यांना एका हिंदुत्ववादी सरकारनेच दिला. आज काही लोक नाटकीपणा करत असले तरी हिंदुत्ववादी समाजाने पद्धतशीरपणे त्यांना उत्तर द्यावे. गिरीश महाजन यांना मिळणारा पाठिंबा हेच दाखवते की बाबासाहेबांचा सन्मान हा आमच्या कृतीतून सतत जिवंत राहणार आहे.

■ **दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला; मुख्यमंत्री फडणवीसांची भावूक प्रतिक्रिया**

‘दमदार आणि दिलदार मित्र सोडून गेला’, अजित पवारांच्या निधनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भावूक प्रतिक्रिया दिली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले की, ‘अजित पवार हे केवळ एक नेते नव्हते तर ते प्रशासनावर पकड असलेले लोकनेते होते. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांची जाण असलेला आणि कठीण प्रसंगातही खंबीरपणे उभा राहणारा असा हा नेता होता. त्यांच्या जाण्याने एक पर्व संपल्याची भावना आहे.’ अजित पवार हे लोकनेते होते, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्याची माहिती असलेला, महाराष्ट्रांच्या प्रश्नांची जाण असलेला नेता होता. त्यांच्याबद्दल जनसामान्यांमध्ये प्रचंड आस्था होती, सर्व परिस्थितीमध्ये न डगमगता पुढे जाणारं हे व्यक्तिमत्व होतं. महाराष्ट्राकरता आजचा दिवस कठीण आहे, दादांसारखं नेतृत्त्व तयार व्हायला अनेक वर्ष लागतात. ज्यावेळी महाराष्ट्राच्या विकासामध्ये महत्त्वपूर्ण देत होते अशा काळामध्ये त्यांचं निघून जाणे अविश्वसनीय आणि मनाला चटका लावणारं असल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. कधीही न भरून निघणारं हे नुकसान आहे. लोकनेते गेल्यावर ही पोकळी भरून काढणं कठीण आहे. इतक्या संघर्षाच्या काळात सोबत काम केले आहे. खरंतरं विश्वास ठेवायला मन तयार होत नाही असंही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

■ **महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावात शांत; रवींद्र चव्हाण यांनी वाहिली अजित पवारांना श्रद्धांजली!**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाची बातमी मनाला सुन्न करणारी आणि अत्यंत धक्कादायक आहे. प्रशासनावर असलेली जबरदस्त पकड, कामाचा अफाट उरक आणि महाराष्ट्राच्या विकासाचा ध्यास असलेला एक धडाडीचा लोकनेता आज आपण गमावला आहे, अशा शब्दांत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली आहे. चव्हाण म्हणाले की, ‘सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री पद भूषवण्याचा विक्रम नावावर असणाऱ्या अजितदादांनी सिंचन, वित्त आणि ऊर्जा यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांना आपल्या शिस्तबद्ध कार्यशैलीने एक नवी दिशा दिली. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. एक कणखर, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व आज काळाच्या पडद्याआड गेले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती प्रदान करो. या कठीण प्रसंगी संपूर्ण भाजपा परिवार पवार कुटुंबिय आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या दुःखात सहभागी आहे.’

**GSB FINANCE LTD.**

CIN:L99999MH2001PLC134193

Regd. Office: 201, 2nd Floor, Eco Space I.T. Park Building, Village Mogra, Old Nagardas Road, Andheri (E), Mumbai 400069. Telephone No.: 0771-4210000 , Email : compliance@gsbfinancelimited.com

Extract of Audited Financial Results for the Quarter and Nine Months ended on 31 December, 2025

(Rs. in Lakh except per share data)

| Sr. No. | Particulars | Quarter ended | | | Nine Months Ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.12.2025 | 30.09.2025 | 31.12.2024 | 31.12.2025 | 31.12.2024 | 31.03.2025 |
| 1 | Total Income from Operations | 30.75 | 31.62 | 43.91 | 93.51 | 150.70 | 179.42 |
| 2 | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 15.15 | (29.46) | 16.97 | 0.52 | 95.33 | 83.12 |
| 3 | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 15.15 | (29.46) | 16.97 | 0.52 | 95.33 | 83.12 |
| 4 | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 18.43 | (29.69) | 13.28 | (0.28) | 82.37 | 71.65 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 18.43 | (29.69) | 13.28 | (0.28) | 82.37 | 71.65 |
| 6 | Equity Share Capital | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 | 600.00 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve) as shown in the Audited Balance Sheet of the previous year | | | | | | 837.77 |
| 8 | **Earnings Per Share (of Rs. 10/- each) (for continuing and discontinued operations) -** | | | | | | |
| | -Basic EPS | 0.31 | (0.49) | 0.22 | (0.00) | 1.37 | 1.19 |
| | -Diluted EPS | 0.31 | (0.49) | 0.22 | (0.00) | 1.37 | 1.19 |

Note :
The above is an extract of the detailed format of unaudited financial results for the quarter and nine months ended on 31 December 2025 filed with Stock Exchanges under Regulation 33 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly financial results is available on the website of the Company: www.gsbgroup.co.in and on the website of the BSE Ltd.: www.bseindia.com.
The above audited financial results were reviewed by the Audit Committee and thereafter approved by the Board of Directors at their meeting held on 28 January 2026.

By order of the Board of Directors
For GSB Finance Ltd
Vivek Kumar Singhal
Managing Director
DIN: 01962224

Place : Mumbai
Date : 28-01-2026

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

सत्यमेव जयते

खालील कामाच्या निविदा कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, २ रा माळा, बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट मुंबई ४०० ००१ दूरध्वनी क्रमांक २२०१६९७५ हे खालील कामासाठी सा.बां. विभागात योग्य वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवित आहेत. ब-१ को-या निविदेचा नमुना, कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयातून दिनांक २९.१.२०२६ ते ५.२.२०२६ पर्यंत देण्यांत येईल. कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई हे भरून पाठविलेल्या सिलबंद निविदा दिनांक ६.२.२०२६ पूर्वी / त्यादिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ. क्र. | कामांचे नांव | अंदाजित किमत (रु. लाखांत) | इसारा रक्कम (रुपये) | काम पूर्ण करण्याची कालमर्यादा | निविदेचा नमूना प्रकार | कोऱ्या निविदा नमुन्याची किमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यलोगेट पोलीस स्टेशन इमारत मुंबई येथील तळमजला ते १ मजल्यावरील दरवाजा, खिडक्या, ग्रील इ, दुरुस्तीचे काम करणे. | ८,३७,९९०/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| २ | एल टी मार्ग मुंबई येथील सीपी ऑफीस आवार येथे कँटीन बाजूस ट्रिमिक्स क्रॉक्रीट, ड्रेनेज लाईन इ. कामे करणे. | ८,२२,८२४/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ३ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवार पोलीस क्वार्टर्स ए ब्लॉक रुम नं. ४५, १३८, १४९ येथे नुतनीकरण करणे. | ८,२८,०७८/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ४ | इंस्टिट्यूट ऑफ सायन्स इमारत मुंबई येथील फिजिक्स विभाग तळमजला ते १ मजल्यावरील खिडक्या, फॉल्स सिलिंग, कपबोर्ड, पार्टीशन व इतर दुरुस्ती करणे. | ८,२८,१८९/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ५ | वॉटर पोलीस लाईन मुंबई येथील ए आणि बी इमारत येथे ओ एच आरसीसी वॉटर स्टोरेज टँक लिकेज व टेरेसवर वॉटरप्रुफिंग दुरुस्ती करणे. | ८,३२,४२७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ६ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवार पोलीस क्वार्टर्स बी ब्लॉक रुम नं. ७, १६, २८ येथे नुतनीकरण करणे. | ८,३१,८६८/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ३३६/- |
| ७ | विस्तारीत आमदार निवास मुंबई येथील आमदार रुम येथे दरवाजा, खिडक्या, डक्ट डोर, पॅसेज पार्टीशन, ग्लास पार्टीशन, पेरगो फ्लोरींग इ. नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | ८,२९,७८८/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ८ | यलोगेट पोलीस स्टेशन इमारत मुंबई येथील मुख्य इमारत व अधिकारी क्वार्टर्स येथे वार्षिक देखभाल व दुरूस्ती करणे. | ८,२२,०३०/- | ८,३००/- | १२ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ९ | जुने सचिवालय मुंबई येथील मुख्य इमारत येथील १, २, ३ मजल्यावरील वरांडा ते कंट्रोलिंग पीजन, ब्रीज पॅसेज येथे विविध कामे करणे. | ८,३२,४७७/- | ८,४००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १० | एल्फिस्टन टेक्नीकल हायस्कूल आवार मुंबई येथील १ मजल्यावरील बी. एड कॉलेज महिला प्रसाधनगृह येथे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | ७,२८,६८२/- | ७,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| ११ | एल टी. मार्ग मुंबई येथील सीपी ऑफिस आवार पोलीस क्वार्टर्स ए ब्लॉक रुम नं. ६८, ६९, ७० येथे नुतनीकरण करणे. | ८,२८,२६४/- | ८,३००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |
| १२ | यलोगेट पोलीस स्टेशन इमारत मुंबई येथील वेदरशेड, प्रिकोटेड जीआय वेदरशेड इ, दुरूस्तीचे काम करणे. | ८,४१,८००/- | ८,५००/- | ४ महिने | ब-१ | रु. ५९०/- |

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालयामध्ये सूचना फलकावार सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द ठरविण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.

जा.क्र. इशवि/निलि/४४८
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
इलाखा शहर विभाग, २ रा माळा,
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक : २२/१/२०२६

सही/-
(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

प्रत :- उप अभियंता, दक्षिण, पश्चिम, मध्य उप विभाग आणि अधीक्षक आमदार निवास मुंबई यांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सुचनाफलक

डि.जी.आय.पी.आर./सी ५३९९/२०२५-२६